## नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र, एकलहरे येथे D.C. Supply System या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मधील कर्मचारी व अभियंते यांचेकरिता (संयुक्तपणे) ``D.C. Sypply System" या विषयाची सखोल माहिती देण्याकरिता नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र एकलहरे येथे एक दिवसीय चर्चासत्र दिनांक २१ फेब्रुवारी २००९ रोजी आयोजित करण्यात आले.

या चर्चासत्राचे उद्घाटन श्री.एस.बी. खराबे, मुख्य महाव्यवस्थापक, नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे व श्री.जी.एम. पचारे महाव्यवस्थापक, नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिप प्रज्वलन व सरस्वती पुजन करून करण्यात आले. या चर्चासत्रात नाशिक, भुसावळ, परळी, पोफळी, वैतरणा, येलदरी तसेच पुणे व नाशिक जल विद्युत मंडळ येथील एकुण ५१ अभियंते व कारागिरांनी सहभाग नोंदविला.

या चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी श्री.एस.बी. खराबे, मुख्य महाव्यवस्थापक नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे यांनी D.C. Supply System या विषयाचे महत्व व उपयुक्तता विषद केली. प्रशिक्षण ही सतत शिकण्याची प्रक्रिया असुन विद्युत केंद्रामध्ये नवनविन तंत्रज्ञान (Technology) महत्तम विद्युत उत्पादनाकरिता येत असते. त्यामुळे महत्तम ज्ञान घेणे हे स्वत:करिता व कंपनीकरिता फायदेशीर आहे. तसेच `Training is Asset' असे नमूद करून या चर्चासत्रातुन D.C. Supply संबंधी अधिकाधिक माहिती घेण्याचा मौलिक सल्ला त्यांनी प्रशिक्षणार्थींना दिला.

D.C. Supply चे महत्त्व, बॅटरी व चार्जरचे कार्य, त्यांनी देखभाल, Trouble Shooting इत्यादी बद्दलची सखोल माहिती श्री.एस.बी. भांदेकर अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) यांनी सोदाहरण दिली. व 'D.C. Supply System' संपुर्ण Plant चे Heart म्हणुन कार्यरत असते, किंबहुना Healthy D.C. Supply वर कार्यरत मनुष्यबळ व मशिनची सुरक्षा सर्वस्वी अवलंबुन असते असे मत श्री.एस.बी. भांदेकर अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण), या सत्राचे व्याख्याते, यांनी चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी नोंदविले.

या चर्चासत्राच्या समारोप प्रसंगी लाभलेले प्रमुख अतिथी श्री.पी.एस. चौधरी, अधीक्षक अभियंता टप्पा क्र. - २ नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, यांनी हे चर्चासत्र अतिमहत्वाचे असल्याचे नमुद करून या चर्चासत्राबद्दल प्रशंसोद्गार काढले.

चांगले Course Material, चांगली शिकविण्याची हातोटी व प्रशिक्षणार्थींनी विषयास दिलेली चांगली साथ (ग्रहण) केल्यामुळे हे चर्चासत्र परिणामकारक झाले, असे मत श्री.एस.बी. खराबे यांनी प्रशिक्षणार्थीचा अभिप्राय बघुन चर्चासत्राच्या निरोप समारंभाप्रसंगी प्रगट केले.

या निरोप समारंभाप्रसंगी सौ.कुळकर्णी (कनिष्ठ अभियंता) नाशिक, श्री.शितोळे (कनिष्ठ अभियंता) उजनी, श्री.मराठे (सहाय्यक अभियंता) भातसा व श्री.सुदाम पाटील (कारागिर ब) नाशिक यांनी निरोप समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त केले.

या चर्चासत्राचे समन्वयक श्री.किरण माथुरकर कार्यकारी अभियंता, श्री.दिलीप नाफडे व श्री.अजय नेटके सहाय्यक अभियंता यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नागपुर विभाग ग्रंथालय संघाचे अधिवेशन संपन्न



नागपुर विभाग ग्रंथालय संघाचे नववे अधिवेशन ऊर्जानगर जिल्हा चंद्रपूर येथे अभिधम्म सार्वजनिक वाचनालय ऊर्जानगर व चंद्रपूर जिल्हा ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ व १८ जानेवारी २००९ ला कामगार मनोरंजन केंद्र ऊर्जानगर येथे संपन्न झाले.

या अधिवेशनाचे उद्घाटन दिनांक १७.०१.२००९ ला लोकप्रिय आमदार श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी माजी राज्यमंत्री, दलितमित्र श्रीमती यशोधरा बजाज, अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालक मुंबई, दि.श्री.चव्हाण, महाऔष्णिक वीज केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक मा.विजय सिंह, महाव्यवस्थापक सिद्धार्थ वाघमारे, अधीक्षक अभियंता ए.के. पाटील, जेष्ठ साहित्यिक मदनराव धनकर, डॉ.रमेश जनबंधु, भरत पोटदुखे, अशोक खंडाळे, शिवकुमार शर्मा, पी.बी.नाईक, डॉ.गजानन कोट्टेवार, आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष विलास बाबु टेंभुर्णे जिल्हा परिषद सदस्य होते. आभारप्रदर्शन के.बी. गजभिये यांनी केले. रात्री स्वरांकित प्रस्तुत अलोणे आणि संच यांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे दुसऱ्या दिवशी दिनांक १८.०१.२००९ ला चर्चासत्र व परिसंवाद त्याच प्रमाणे वाचनालयाशी निगडीत अडचणी व समस्या व त्या दुर करण्यासाठी मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले यात प्रामुख्याने प्रा.धनराज डहाट, प्रा.दि.बा. साबळे, बी.नाईक, श्री.खरवटकर, सौ.विभा डांगे आदि मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष के.टी. नागदेवे होते. संचालन एन.डी. डांगे व सी.जी.रामटेके यांनी केले. आभार बी.बी. मेश्राम यांनी पार पाडले.

या वेळेस सार्वजनिक वाचनालयाचे उल्लेखनिय कामगिरी बद्दल प्रा.मुकुंद उगे यांना ग्रंथालय भुषण पुरस्कार व श्री.मेश्राम तिरोडा यांना ग्रंथालय पुरस्कार आ.शोभाताई फडणविस यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला.

समारोपीय कार्यक्रमाकरिता मान.शांतारामजी पोटदुखे माजी केंद्रीय राज्यमंत्री यांचे प्रामुख्याने उपस्थिती होती. डॉ.रमेश जनबंधु व अनिल बोरगमवार यांनी ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या समस्या संबंधित व ग्रंथालयाच्या संबंधात विविध ठराव मांडुन एकमताने पारीत केले.

या अधिवेशनाचे यशस्वी आयोजनासाठी अभिधम्म सार्वजनिक वाचनालयाचे पदाधिकारी सर्वश्री के.बी. गजभिये, सी.एम. डांगे, बी.बी. मेश्राम, एन.डी. डांगे, बी. एस.दुर्गे ए.बी. देवगडे, सी.जी. रामटेके, डी.जी. तायडे, बी.ए. चहांदे, ए.के. जनबंधु, पि.एन.भांगे, बाबा भगत, ग्रंथपाल अजय चहारे, दिनकर लोहकरे यांनी विशेष प्रयत्न केले.



राष्ट्रीय आंतरविद्युत कंपनी क्रिकेट स्पर्धेसाठी रवाना होणाऱ्या महानिर्मितीच्या क्रिकेट संघाला शुभेच्छा देताना नाशिक औ.वि. केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री.शालिक खराबे, श्री.अरविंद बागडे, उप मुख्य औ.सं.अधिकारी, श्री.संजय अस्वले, औ.सं. अधिकारी, श्री.अभ्युदय वाघ, संघ व्यवस्थापक आणि क्रिकेट संघ.